**L. A. BILL No. LXXIV OF 2025.**

A BILL

TO AMEND MAHARASHTRA SETTLEMENT OF ARREARS OF TAX, INTEREST, PENALTY OR LATE FEE (PAYABLE BY PUBLIC SECTOR UNDERTAKING COMPANIES) ACT, 2025.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४.**

**महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ८ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

२०२५ चा महा. १७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

एचबी ८०२—१

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, २१ मार्च २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या संक्षिप्त नावाची सुधारणा.

२०२५ चा महा. १७.

**२.** महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या संक्षिप्त नावामधील, " (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या)" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ग) " अर्जदार " याचा अर्थ, ज्या संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमान्वये अथवा कोणत्याही शासन निर्णयाद्वारे स्थापन केलेल्या आहेत, ज्या संबध्द अधिनियमान्वये आकारलेला किंवा आकारणीयोग्य असलेला कर, व्याज, शास्ती किंवा बिलंब शुल्क यांच्या थकबाकीचे प्रदान करण्यास पात्र आहेत आणि ज्या या अधिनियमाखालील शर्तींचे पालन करून तडजोडीचा लाभ घेण्यासाठी इच्छुक आहेत अशा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्या, महामंडळे, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, विभाग, ग्रामीण किंवा नागरी स्थानिक संस्था अथवा इतर प्राधिकरणे, उपक्रम किंवा संस्था, असा आहे.".

विधिग्राह्यीकरण.

**४.** महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) यात अथवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त अधिनियमाच्या प्रारंभानंतर, कोणत्याही अर्जदाराकडून उक्त अधिनियमान्वये प्रदान केलेल्या किंवा गोळा केलेल्या उक्त अधिनियमान्वये व्याख्या केल्याप्रमाणे संबद्ध अधिनियमान्वये कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या आवश्यक रकमेचे कोणतेही प्रदान हे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणु काही २१ मार्च, २०२५ पासून सतत अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार यथोचितरीत्या व वैधरीत्या प्रदान करण्यात व गोळा करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि नेहमीकरिता प्रदान करण्यात व गोळा करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार,— २०२५ चा महा. १७.

(क) आवश्यक रकमेच्या मार्गाने मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणात अथवा कोणत्याही न्यायालयासमोर किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही ;

(ख) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणतेही प्राधिकरण, अशा आवश्यक रकमेच्या मार्गाने मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, बजावणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विविध अधिनियमांन्वये जो आकारण्यात आला होता, लादण्यात आला होता किंवा प्रदेय होता तो, कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नोंदणीकृत असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या कराच्या, व्याजाच्या, शास्तीच्या किंवा विलंब शुल्काच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ अधिनियमित करण्यात आला आहे.

**२.** कंपनी अधिनियम, २०१३ या व्यतिरिक्त अन्य केंद्रीय अधिनियमांन्वये किंवा राज्य अधिनियमांन्वये ज्यांची नोंदणी केलेली आहे, किंवा जे शासन निर्णयाद्वारे घटित केलेले आहेत अशी महामंडळे, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, विभाग, ग्रामीण किंवा नागरी स्थानिक संस्था किंवा इतर प्राधिकरणे, उपक्रम किंवा संस्था यांच्याकडून विवाद केल्या जाणाऱ्या कराच्या आकारणीच्या प्रचंड रकमा आहेत.

म्हणून, करांच्या थकीत असणाऱ्या देय रकमांचा अंतर्भाव असलेली रक्कम मुक्त करण्याच्या आणि जुने प्रलंबित विवाद कमी करण्याच्या दृष्टीने, थकबाकीचे एकरकमी प्रदान करून त्यांच्या थकबाकीची तडजोड करण्यास जे इच्छुक असतील अशी प्राधिकरणे, महामंडळे, विभाग, इत्यादींच्या कराच्या, व्याजाच्या, शास्तीच्या किंवा विलंब शुल्काच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांचे जुने प्रलंबित विवाद बंद करण्यासाठी एकरकमी प्रदानाच्या पर्यायासाठी तरतूद करणे, इष्ट आहे असे शासनास वाटते. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **अजित पवार,**

दिनांक २ जुलै २०२५. उप मुख्यमंत्री (वित्त).

## वित्तीय ज्ञापन

महाराष्ट्र शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विविध अधिनियमांखालील प्राधिकरणाच्या, महामंडळांच्या, विभागांच्या, ग्रामीण किंवा नागरी स्थानिक संस्थांच्या, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या किंवा इतर उपक्रमांच्या अथवा संस्थांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी तरतूद करण्याकरिता हे विधेयक प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

(शा.म.मु.) एचबी ८०२—३ (४४५–७-२०२५)

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राहीकरण) विधेयक, २०२५ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

**सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक ७४— महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट**

**[महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यातील उतारे]**

**(सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७)**

संक्षिप्त नाव. **१**. या अधिनियमास, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

व्याख्या. **२**. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) व (ख) ** ** **

(ग) “अर्जदार” याचा अर्थ, या अधिनियमाखालील शर्तीचे पालन करून त्याद्वारे तडजोडीचा लाभ घेण्यासाठी जी इच्छुक असेल अशी, संबद्ध अधिनियमान्वये आकारलेला किंवा आकारणीयोग्य असलेला कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीचे प्रदान करण्यास जबाबदार असलेली सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपनी, असा आहे.

**स्पष्टीकरण.—** “सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपनी” या संज्ञेचा अर्थ, कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये सरकारी कंपनी म्हणून नोंदणी केलेली कोणतीही कंपनी, असा आहे;

(घ) ते (ध) ** ** **

**३**. ते **२०**. ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४.]**

**[महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. अजित पवार,**

उप मुख्यमंत्री (वित्त).]

**[विधानसभेने दिनांक ८ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव-१,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.